उपविभागीय अधिकारी नाशिक उपविभाग नाशिक यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र. 0253-2578400 e-mail :- sdmnsk123@gmail.com

क्र.जमाबंदी /कावि / 666/2016
नाशिक दिनांक:-21 .02.2017

प्रति,
श्री. महेश खंडु गायधनी व इतर तर्फे
जी.पी.ओ. होल्डर श्री. सदगुरु शिवराम कन्स्ट्रक्शन प्रा.लि.
डायरेक्टर श्री. प्रमोद अशोक मुर्केवार
रा. नाशिक रोड, ता.जि.नाशिक

विषय :- बांधकाम परवानगी मिळणे बाबत... (निवासी प्रयोजनार्थ)
मौजे पळसे ता.जि.नाशिक येथील गट नं. 1419/1/2अ व 1419/2/2अ मधील प्लॉट नं.1 चे क्षेत्र 2862.68 चौ.मी.

संदर्भ : 1) आपला दिनांक 16.11.2015 रोजीचा अर्ज.
2) या कार्यालयाकडील बिनशेती क्र.जमा/ एनएएसआर/ 57/2014 दि.16.07.2014.
3) सहा.संचालक नगररचना विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. बांप / मौजे पळसे ता.नाशिक/ ग.नं.1419/1/2अ,1419/2/2अ/ ससंना/3/ 2017 दि.02.01.2017
4) मंडळ अधिकारी शिंदे यांचेकडील पत्र जा.क्र.पाथर्डी/51/2017 दि. 12.01.2017 स्थळ निरिक्षण अहवाल.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, मौजे पळसे ता.जि.नाशिक येथील गट नं. 1419/1/2अ, व 1419/2/2अ मधील प्लॉट नं.1 चे क्षेत्र 2862.68 चौ.मी. मध्ये निवासी प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणे बाबत आपण संदर्भात नमुद 1 च्या अर्जान्वये विनंती केली आहे.

मौजे पळसे, ता.नाशिक येथील गट नं. 1419/1/2 पैकी व 1419/2/2 पैकी क्षेत्र 3270.75 चौ.मी क्षेत्रास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 44 मधील तरतुदीनुसार या कार्यालयाचे संदर्भिय क्र.2 अन्वये निवासी प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी दिलेली आहे.

सहा.संचालक नगररचना विभाग, नाशिक यांनी संदर्भिय नमुद क्र.3 च्या पत्रानुसार विषयांकित मिळकतीच्या बांधकाम प्रस्तावास रहिवास प्रयोजनार्थ मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार विषयांकित मिळकती संदर्भात सहा.संचालक नगररचना नाशिक यांचेकडील दि.02.01.2017 रोजीचे पत्र व या कार्यालयाच्या दि.16.07.2014 रोजीच्या बिनशेती आदेशामधील नमूद असलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून आपणास मौजे पळसे ता.जि.नाशिक येथील गट नं. 1419/1/2अ व 1419/2/2अ मधील प्लॉट नं.1 चे क्षेत्र 2862.68 चौ.मी. बांधकामास परवानगी देण्यात येत आहे.

सोबत बांधकाम नकाशा मंजूर अभिन्यास व त्याबाबतचे पत्र जोडले आहे.

उपविभागीय अधिकारी
नाशिक उपविभाग नाशिक

प्रत : 1) **तलाठी पळसे ता.नाशिक** यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
2) म.उप अधिक्षक भुमी अभिलेख, नाशिक, ता.नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

सही/-
उपविभागीय अधिकारी
नाशिक उपविभाग नाशिक

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,

नाशिक शाखा.

कृषी भवन, दुसरा मजला, जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ लि. नाशिक, एन.डी.सी.सी. बँकेच्या शेजारी, द्वारका चौक, नाशिक - १, Email:- adtp_nashik@rediffmail.com , दूरध्वनी / फॅक्स क्र. ०२५३-२५९९८३४

(25)

जा.क्र बांप/मौ. पळसे ता.नाशिक/ग.नं.१४१९/१/२अ,१४१९/२/२अ/ससंना/ 3 दिनांक : 2/9/२०१६
2/9/2016

प्रति,

उपविभागीय अधिकारी,
नाशिक उपविभाग, नाशिक

विषय :- **मौजे पळसे ता. व जि.नाशिक**
येथील ग.नं.१४१९/१/२अ, १४१९/२/२अ , भू.क्र. १ क्षेत्र २८६२.६८ चौ.मी. मधील **रहिवास** या प्रयोजनासाठी बांधकाम नकाशे मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) आपले पत्र क्र.जमाबंदी/कावि/६६६/२०१५ , दि.१९.११.२०१५.
२) अर्जदार यांचा दि.२९.६.२०१६ व दि.२३.८.२०१६ रोजीचा अर्ज.

विषयांकित जागा मंजूर प्रादेशिक योजना नाशिक अंतर्गत नाशिक महानगरपालिका परिसर नकाशानुसार रहिवास विभागात समाविष्ट आहे. विषयांकित भूखंड हा मौजे पळसे ता.नाशिक येथील ग.नं.१४१९/१/२अ, १४१९/२/२अ मधील या कार्यालयाने पत्र क्र.१५५७, दि.५.८.२०१५ अन्वये सिमांकित मंजुरीस्तव शिफारस केलेल्या अभिन्यासातील आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब अंतर्गत Second Schedule Part-I व Part-II या तरतूदीनुसार विकास शुल्क रु.१,०८,७००/- इतकी रक्कम दि.१.१२.२०१६ रोजी शासकीय कोषागारात जमा केलेली आहे. तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता अधिमुल्य (Premium) रु.४,१८,१७०/- इतकी रक्कम दि.१.१२.२०१६ रोजी चलनाद्वारे शासकीय कोषागारात जमा केलेली आहे. तसेच भविष्यात सदर रकमेबाबत काही तफावत निघाल्यास, नियमानुसार वाढीव रक्कम भरणे अर्जदार यांचे बंधनकारक राहील.

मंजुर प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.२.११ नुसार अर्जदार यांनी शासन नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात संयुक्त, Personal Ledger Account काढणेबाबत शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत अर्जदार यांचेकडुन "नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरण्यास बांधिल राहील," असे बंधपत्र / प्रतिज्ञापत्र आपले स्तरावर प्राप्त करुन घेणे तसेच महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा निर्णय क्र.बीसीए २००९/प्र.क्र.१०८/कामगार ७-अ, दि.२१.०६.२०१० नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक राहील.

संदर्भीय पत्रान्वये अभिप्रायार्थ प्राप्त विषयांकित भुखंडात **रहिवास** प्रयोजनासाठी सादर केलेले बांधकाम नकाशे सर्वसाधारणपणे योग्य असून, सदर नकाशांना मंजूरीची शिफारस खालील अटींस अधिन राहून करण्यांत येत आहे.

१) भूखंडाचा वापर **रहिवास** कारणासाठीच करणेत यावा.

२) भूखंडाची मापे नकाशावर दर्शविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर जुळत असली पाहीजेत, व समोरुन, मागून व बाजूने सोडावयाचे सामासिक, अंतरे जागेवर खुली असणे आवश्यक आहे.

३) सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ती कामे नियोजन प्राधिकरणांस समाधानकारक वाटतील अशा प्रकारे केली पाहीजे.

४) जोत्या पर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मंजूर नकाशा प्रमाणे आहे असे प्रमाणपत्र नियोजन प्राधिकरणाकडून घेतल्या शिवाय पुढील बांधकाम करु नये.

५) अर्जदाराचे यांचे इंजिनिअर/आर्किटेक्ट यांचेकडून Earth quake Structural Stability Certificate प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

६) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पूर्ततेचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर सुरु करु नये.

७) दिलेली शिफारस ही फक्त एक वर्षासाठी वैध राहील व हया मुदतीत बांधकाम सुरु न झाल्यांस शिफारशींचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.

८) नियोजन प्राधिकरणाकडुन / महसुल खात्याकडून किंवा इतर खात्याकडून आवश्यक ती परवानगी मिळवणे ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी राहील.

९) या सोबत शिफारस केलेले बांधकाम नकाशे सुधारित करुन पुन्हा परवानगी घ्यावयाची असल्यांस मंजूर बांधकाम नकाशे सुधारित करण्याची कारणे नमूद करणे आवश्यक आहे.

१०) विषयांकित भूखंडांत Rain Water Harvesting बाबतची अंमलबजावणी करणे भूखंडधारकास बंधनकारक राहील.

११) विषयांकित क्षेत्राच्या स्थळाबाबत व चर्तु:सिमेबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास जागेवरील परिस्थितीनुसार नकाशा सुधारित मंजूर करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१२) इमारत बांधकामात Fly Ash चा वापर करणे बंधनकारक राहील.

१३) प्रस्तावित अभिन्यास नकाशावरती जमीनमालक व संबंधित वास्तुविशारद यांनी स्वाक्ष-या केलेल्या असून, सदर स्वाक्ष-या व मालकी हक्क या बाबत महसुल विभागाने आपले स्तरावर खात्री करणे आवश्यक आहे.

१४) विषयांकित गांगेस मौजे पळसे ता. व जि.नाशिक ग.नं.१४१९/१/२अ, १४१९/२/२अ खालील क्षेत्रात या कार्यालयाने पत्र क्र.१५५७, दि.५.८.२०१५ अन्वये मंजुरीस्तव शिफारस केलेल्या अभिन्यासातील मधील ९.० मी. रुंद रस्त्यावरुन पोचरस्ता उपलब्ध होत आहे. तसेच सदर पोच रस्त्याबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही अर्जदार यांची राहील.

१५) अर्जदाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास केलेली शिफारस रद्द समजणेत येईल.

मंजुरीसाठी शिफारस केलेल्या बांधकाम नकाशाची एक प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालयाच्या अभिलेखासाठी ठेऊन, मंजुरीसाठी शिफारस केलेल्या नकाशांच्या ४ प्रती सोबत पाठविणेत आहे.

(जयश्रीराणी बा. सुर्वे)
सहायक संचालक, नगर रचना,
नाशिक

Recd
09/01/17
(Dhananjay Bagul)